॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

*** सुविचार ***
जिद्द असेल तर अशक्य गोष्टही शक्य होते..

अहिल्यानगर | गुरुवार, दि. २२ ऑक्टोबर २०२६ | वर्ष ७ वे | अंक १०६ वा | पाने ४ | किंमत ३ रुपये | RNI No. MAHMAR / 2012 / 47715 | 9420802145

# जिल्हा बँकेच्या ९ जागा बिनविरोध;१२ जागांसाठी निवडणूक

## विखे-थोरात सहमती सुपरफास्ट । लंके-लोखंडे यांच्यात आघाडी तर शिंदेंचे चार उमेदवार स्वतंत्र



**● अहिल्यानगर । वीरभूमी –**
जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत बुधवारी अर्ज माघारीच्या शेवटच्या दिवशी विखे-थोरात सहमती एक्सप्रेसला ९ जागा बिनविरोध करण्यात यश आले. तर १२ जागांसाठी विखे-थोरात सहमती एक्सप्रेस, शिंदे आणि लंके-लोखंडे आघाडीत निवडणूक होत आहे. बुधवारी माघारीच्या अखेरच्या दिवशी तालुका सोसायटी मतदारसंघातून आ. मोनिका राजळे (पाथर्डी), आ. अक्षय कर्डिले, माजी खासदार डॉ. सुजय विखे (राहाता), जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा राजश्री घुले (शेवगाव), संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपीन कोल्हे (कोपरगाव), श्रीरामपूरचे नगराध्यक्ष करण ससाणे (श्रीरामपूर) यांच्या विरोधातील उमेदवारी अर्ज माघारी निघाल्याने हे उमेदवार बिनविरोध निवडून आले तर यापूर्वीच माजी मंत्री शंकरराव गडाख (नेवासा), दूध संघाचे माजी अध्यक्ष रणजित देशमुख (संगमनेर) तर बिगर शेती मतदारसंघातून जिल्हा परिषदेचे माजी सदस्य सचिन जगताप अशा एकुण नऊ जागा बिनविरोध झाल्या आहेत. सोसायटी मतदारसंघातील सात तर राखीव मतदारसंघात दोन अशा नऊ जागा बिनविरोध करण्यात पालकमंत्री राधाकृष्ण विखे व माजीमंत्री बाळासाहेब थोरात या सहमती एक्सप्रेसला यश आले आहे.

अखेरच्या टप्प्यात निवडणूक बिनविरोध करण्याचा मार्ग निष्फळ ठरला असला तरी संचालक मंडळाच्या २१ पैकी ९ जागा बिनविरोध झाल्या आहेत. आत उर्वरित १२ जागांसाठी निवडणूक होणार आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत दुपारी तीनपर्यंत असली तरी प्रत्यक्षात रात्री उशिरापर्यंत ही प्रक्रिया सुरूच होती.

उर्वरित सोसायटी मतदारसंघातील अकोले, श्रीगोंदा, पारनेर, राहुरी, कर्जत व जामखेड या ६ जागांसह महिला राखीवच्या दोन, अनुसूचित जाती-जमातीची एक, इतर मागसवर्गीयची एक, विजाभजची एक अशा १२ जागांसाठी निवडणूक होणार आहे.

या निवडणुकीत आता विखे-थोरात यांची सहमती एक्सप्रेस, सभापती राम शिंदे यांचे स्वतंत्र तर खासदार नीलेश लंके-माजी खासदार सदाशिव लोखंडे यांच्यात आघाडी असे तीन पॅनल एकमेकांविरुद्ध असल्याचे प्राथमिक चित्र आहे.

जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध करण्यासाठी अखेरच्या क्षणापर्यंत प्रयत्न सुरू होते. मात्र विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी सकाळी अचानक चार जागांसाठी उमेदवार जाहीर केले. त्यात कर्जतमधून ज्योती प्रकाश शिंदे, जामखेडमधून सचिन घुमरे, महिला राखीवच्या एका जागेसाठी जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष मंजुषा गुंड व मागासवर्गीय मतदारांघासाठी आजिनाथ हजारे यांची नावे जाहीर केल्यानंतर निवडणूक होणार असल्याचे चित्र स्पष्ट झाले. आता या चार जागांमध्ये सभापती शिंदे विरुद्ध विखे-थोरात यांची युती अशी लढत होणार आहे. तर अकोले, श्रीगोंदा, पारनेर, नगर, श्रीगोंदा या सोसायटीच्या चार जागांसह महिला राखीवची एक जागा, अनुसूचित जाती-जमातीची एक, इतर मागसवर्गीयची एक, विजाभजची एक या राखीवच्या चार अशा ८ जागांवर लंके-लोखंडे यांच्या नेतृत्वाखालील मंडळ व विखे- थोरात सहमती युती अशी लढत होणार आहे. तसेच महिला राखीव एक जागा व मागसवर्गीय एक अशा दोन जागांसाठी मात्र विखे- थोरात मूर्ती विरूद्ध राम शिंदे विरुद्ध लंके- लोखंडे आघाडी यांच्यामध्ये निवडणूक होईल.

निवडणुकीत विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांच्या नेतृत्वाखाली चार उमेदवारांचे स्वतंत्र पॅनल असणार का, असा प्रश्न केला असता राम शिंदे म्हणाले, पालकमंत्र्यांनी कर्जत, जामखेड व्यतिरिक्त आणखी दोन जागा देण्याचा शब्द दिला होता. त्यांनी सांगितल्यानुसार आम्ही त्यांच्याबरोबर बिनविरोध निवडणूक करण्यासाठी प्रयत्न केले. त्यानंतरही ते आम्हाला बरोबर घेणार का, असा प्रश्न निर्माण होत असेल तर त्यांनी भूमिका जाहीर करावी, त्यानंतर आम्ही भूमिका घेऊ, असे स्पष्ट केले.

उमेदवारी अर्ज माघारीसाठी बुधवारी अखेरची मुदत होती. या मुदतीमध्ये जास्तीत-जास्त उमेदवारांची माघारी होण्यासाठी विखे पितापुत्रांकडून जोरादार मोर्चेबांधणी करण्यात आली होती. त्यामुळे मोठ्या संख्येने उमेदवारी माघारीसाठी उमेदवारांसह सुचक, अनुमोदक व समर्थकांची एकच गर्दी निवडणूक कार्यालयात झाली होती. सोमवारपर्यंत २२ जणांनी माघार घेतली होती. त्यामुळे २१७ उमेदवारांचे अर्ज राहिले होते. एवढ्या मोठ्या प्रमाणावर उमेदवारांची माघार घेण्याचे मोठे आव्हान उभे राहिले होते. मात्र विखे पिता-पुत्रांसह थोरात व आमदार संग्राम जगताप यांनी शर्तीचे प्रयत्न करीत मोठ्या प्रमाणावर उमेदवारांचे माघार घेण्यास यश मिळविले.

### दहा वर्ष बंधनाचा घुले, गायकर व पिसाळ यांना फटका

■ भारतीय रिझर्व बँकेच्या नवीन नियमानुसार सलग दहा वर्ष संचालक पदी राहण्यास मर्यादा निर्माण झाल्याने बँकेचे माजी अध्यक्ष चंद्रशेखर घुले, सीताराम गायकर व माजी संचालक अंबादास पिसाळ यांनी आपली उमेदवारी मागे घेतली. माजी आमदार भानुदास मुरकुटे यांचा अर्ज बाद झाला असला तरी त्यांच्यापुढे हीच समस्या होती. घुले यांनी पत्नी राजश्री घुले यांचा अर्ज ठेवून स्वतः माघारी घेतल्याने राजश्री घुले बिनविरोध झाल्या तर अकोलेमध्ये गायकर यांनी माघार घेऊन मुलगी संजीवनी शिंदे यांचा अर्ज ठेवला आहे. तसेच कर्जतमधून पिसाळ यांनी माघार घेऊन चिरंजीव तुषार पिसाळ यांचा अर्ज ठेवला आहे.

## SPOT NEWS

### निधी न दिल्यास मुख्यमंत्र्यांना ‘खारा दिवाळी फराळ’ पाठवणार

**● मुंबई –** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाला (एसटी) आवश्यक निधी ४ नोव्हेंबरपर्यंत न दिल्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना ‘खारा दिवाळी फराळ’ पाठवून सरकारच्या अर्थ खात्याचा निषेध करण्यात येईल, असा इशारा महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी नुकताच दिला. एसटीने सवलत मूल्याची थकबाकी, दैनंदिन खर्चासाठी आवश्यक अतिरिक्त निधी आणि दिवाळी भेटीची रक्कम देण्याची मागणी केली आहे. ही रक्कम ३ नोव्हेंबरपर्यंत न मिळाल्यास ४ नोव्हेंबर रोजी हे निषेध आंदोलन करण्यात येईल, असे बरगे यांनी सांगितले. एसटीने सरकारकडे निधीची मागणी केल्यानंतर अर्थ खात्याकडून वारंवार त्यात मिठाचा खडा टाकला जात असल्याचा आरोप बरगे यांनी केला. सरकारच्या या भूमिकेच्या निषेधार्थ एसटी कर्मचाऱ्यांची दिवाळी खारट करणाऱ्या मुख्यमंत्र्यांना आणि अर्थ विभागाच्या अधिकाऱ्यांना ‘खारा दिवाळी फराळ’ पाठविण्यात येईल, असे ते म्हणाले. एसटीने सप्टेंबर महिन्याचे वेतन आणि थकीत देणी भागविण्यासाठी सरकारकडे १,०१५ कोटी रुपयांची मागणी केली होती. मात्र, सरकारने केवळ ३८०.०६ कोटी रुपये दिल्याने महामंडळाच्या आर्थिक अडचणी वाढतील, असा दावा त्यांनी केला. एसटी कर्मचाऱ्यांची गेल्या दोन ते तीन वर्षांतील ५,७४० कोटी रुपयांहून अधिक देणी थकीत आहेत. यामध्ये कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधी (पीएफ) आणि उपदानाची (ग्रॅच्युइटी) सुमारे ३,३५० कोटी रुपयांची रक्कम संबंधित ट्रस्टकडे जमा करण्यात आलेली नाही, असे बरगे यांनी सांगितले.

### फसवणूक करणाऱ्या टोळीचा ग्रामस्थांकडून पर्दाफाश

**● राहुरी –** विवाहासाठी वधू मिळवून देण्याचे आमिष दाखवून तीन तरुणांची एकूण १४ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार राहुरी तालुक्यातील कणगर आणि श्रीरामपूर तालुक्यातील अशोकनगर येथे उघडकीस आला आहे. या प्रकरणातील संशयित एजंट महिलेला ग्रामस्थांनी पकडून राहुरी पोलिसांच्या ताब्यात दिले. या महिलेसह सात जणांवर राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, राहुरी तालुक्यातील कणगर तसेच श्रीरामपूर तालुक्यातील अशोकनगर येथील काही तरुण विवाहासाठी वधूच्या शोधात होते. याचदरम्यान त्यांची एका एजंट महिलेशी ओळख झाली. या महिलेने विवाह जमवून देण्याचे आश्वासन देत कणगर येथील एका तरुणाकडून चार लाख रुपये, तर अन्य दोन तरुणांकडून प्रत्येकी पाच लाख रुपये, अशी एकूण १४ लाख रुपयांची रक्कम घेतल्याचा आरोप आहे. त्यानंतर कणगर आणि अशोकनगर येथील काही महिला व पुरुषांनी तिच्यावर पाळत ठेवली. ती आढळून आल्यानंतर ग्रामस्थांनी तिला पकडले. त्यानंतर तिला राहुरी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

## मढी दर्शनासाठी आलेल्या भाविकाची कार मुळा कालव्यात कोसळली; तीन जण ठार

**● नेवासा । वीरभूमी –**
पाथर्डी तालुक्यातील श्रीक्षेत्र मढी येथे दर्शनासाठी आलेल्या नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यातील कासारवाडी येथील भाविकांच्या कारवरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने कार थेट मुळा पाटबंधारे विभागाच्या कालव्यात कोसळून, तीन जण तर एक जण जखमी झाला आहे. हा अपघात घोडेगाव ते सोनई रस्त्यावरील शनेश्वर दूध संघाजवळ असलेल्या कालव्याच्या पुलावर बुधवारी सायंकाळी झाला. कालव्यात पाणी सुरू असल्याने कारमधील तिघांचा मृत्यू झाला, तर एकजण सुदैवाने किरकोळ जखमी झाला.

याबाबत समजलेली माहिती अशी की, सिन्नर तालुक्यातील कासारवाडी येथील चौघेजण कार (क्र. एमएच ०३ बीडब्लू ७८८४) ने पाथर्डी तालुक्यातील श्रीक्षेत्र मढी येथे दर्शनासाठी जात असताना, चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. त्यामुळे कार पुलावरून थेट कालव्यात कोसळली. या दुर्घटनेत रणधीर भाऊसाहेब, केरू जगताप आणि सुभाष बिडवे यांचा मृत्यू झाला. तर संदीप सदाशिव कदम हा या अपघातात किरकोळ जखमी झाला.

अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत, मदतकार्य सुरू केले. सोनई पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक किशोर जाधव, सहायक फौजदार मच्छिंद्र आडकित्ते, पो. कॉ. सुनील पालवे, वजीर शेख यांच्यासह कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला.

क्रेनच्या साहाय्याने कालव्यातील कार बाहेर काढण्यात आली. मृत व्यक्तींचे मृतदेह शवविच्छेदनासाठी नेवासा येथे पाठविण्यात आले. या दुर्घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, अपघाताबाबत पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## महाराष्ट्रातील सामाजिक संस्थांनी दुष्काळ निवारणासाठी पुढाकार घ्यावा : अण्णा हजारे

**● पारनेर । वीरभूमी –**
महाराष्ट्रातील यंदाच्या गंभीर दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी राज्यातील सामाजिक आणि सेवाभावी संस्थांनी पुढाकार घेऊन मदतीचा हात द्यावा, असे आवाहन ज्येष्ठ समाजसेवक अण्णासाहेब हजारे यांनी केले आहे. राळेगणसिद्धी गावातील दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी स्वामी विवेकानंद कृतज्ञता निधी ट्रस्टच्या वतीने विशेष दुष्काळ निवारण उपक्रम राबविण्यात येणार असून, त्यासाठी सुमारे २० लाख रुपयांचा निधी खर्च केला जाणार आहे.



स्वामी विवेकानंद कृतज्ञता निधी ट्रस्टची बैठक सुमारे सव्वा तास चालली. या बैठकीत दुष्काळ निवारणासाठी करावयाच्या विविध उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. दरवर्षी ट्रस्टच्या माध्यमातून पुरस्कारांसाठी खर्च करण्यात येणारी रक्कम यंदा दुष्काळ निवारणासाठी वापरण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. जनावरांच्या चाऱ्यासाठी होणाऱ्या खर्चापैकी ५० टक्के खर्च गावाच्या सहभागातून उचलण्याचे नियोजन करण्यात येणार आहे.

दुष्काळावर केवळ तात्पुरते उपाय न करता गावातील उपलब्ध मनुष्यबळ, पशुधन आणि पाणीसाठ्याचा सविस्तर ताळेबंद तयार करून नियोजनबद्ध उपाययोजना केल्या जाणार आहेत. गावातील गाई, म्हशी, बैल आणि इतर जनावरांची संख्या निश्चित करून पुढील पावसाळ्यापर्यंत त्यांना पुरेसा चारा व पाणी उपलब्ध करून देण्यावर भर दिला जाणार आहे.

या नियोजनामुळे शेतकऱ्यांवर पशुधन विकण्याची किंवा जनावरांना चारा छावण्यांमध्ये पाठवण्याची वेळ येऊ नये, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.

गावातील लोकसंख्येनुसार पिण्याच्या पाण्याची गरज निश्चित करून उपलब्ध जलस्रोतांचे योग्य व्यवस्थापन केले जाणार आहे. विहिरी आणि कूपनलिकांमधून होणारा पाण्याचा उपसा गरजेपुरता मर्यादित ठेवून अपव्यय टाळण्याचे नियोजन आहे. तसेच प्रत्येक नागरिकाला पाणी बचतीची शपथ देऊन सामूहिक सहभागातून दुष्काळाचा मुकाबला करण्याचे आवाहन करण्यात येणार आहे. येत्या आठ दिवसांत राळेगणसिद्धी येथे विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात येणार असून, त्यामध्ये दुष्काळ निवारणाच्या उपाययोजनांवर सखोल चर्चा केली जाणार आहे. राळेगणसिद्धीने जलसंधारण आणि जलव्यवस्थापनाच्या माध्यमातून देशासमोर आदर्श निर्माण केला आहे. गावातील एकजूट आणि सामूहिक प्रयत्नांच्या बळावर यंदाच्या दुष्काळावरही मात करता येईल, असा विश्वास अण्णासाहेब हजारे यांनी व्यक्त केला.

# पिण्याचे पाणी व चाऱ्याच्या नियोजनासाठी प्रशासन ॲक्शन मोडवर

## पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांचे निर्देश

**● शिर्डी । वीरभूमी –**
अहिल्यानगर जिल्ह्यात पावसाने दिलेली ओढ, खरीप पिकांचे झालेले नुकसान आणि पिण्याच्या पाण्यासह जनावरांच्या चार्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाल्यामुळे जिल्ह्यात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर जलसंपदा तथा पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी तालुकानिहाय आढावा बैठका घेऊन पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देण्याचे आणि चारा टंचाईवर मात करण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याचे कडक निर्देश प्रशासनाला दिले आहेत. ९ ऑक्टोबर २०२६ रोजी केंद्र शासनाच्या पथकानेही जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीची पाहणी केली असून, यामुळे टंचाईची दाहकता अधोरेखित झाली आहे.

वाढत्या टंचाईच्या पार्श्वभूमीवर अपूर्ण पाणीपुरवठा योजना तातडीने पूर्ण करणे, बंद योजनांची दुरुस्ती आणि पारनेर शहरासाठी सुपा औद्योगिक वसाहतीतून पाणी उपलब्ध करून देण्याबाबत नियोजन केले जात आहे. गावांना शुद्ध पाणी मिळावे यासाठी उद्भवाच्या ठिकाणी फिल्टर प्लांट बसविण्याचा राज्यातील पहिला प्रयोग अहिल्यानगर जिल्ह्यात सुरू केला जात असून, यासाठी आवश्यक निधी देण्याची ग्वाही पालकमंत्र्यांनी दिली आहे. तसेच, टँकरद्वारे होणार्या पाणीपुरवठ्यावर आणि पाण्याच्या गुणवत्तेवर कडक देखरेख ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

जिल्ह्यातील दुग्ध व्यवसाय वाचवण्यासाठी आणि चारा टंचाई टाळण्यासाठी चारा डेपो सुरू करण्याचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर मांडला जाणार आहे. याशिवाय, कमी जागेत व कमी पाण्यात पौष्टिक चारा निर्मितीसाठी हायड्रोपोनिक्सफ तंत्रज्ञानाचा वापर करणे आणि शेतकर्यांना चारा बियाणे उपलब्ध करून देणे यावर भर दिला जात आहे. पशुसंवर्धन विभागाकडून सध्या गावपातळीवर जनावरांची संख्या आणि चार्याच्या गरजेचा अचूक डेटा गोळा करण्याचे काम वेगाने सुरू आहे.



पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या पुढाकारामुळे सर्वच तालुक्यांतील टंचाईचे प्रश्न शासनस्तरावर पोहोचले आहेत. पाणी, चारा, पीक नुकसानीचे पंचनामे आणि जलसंधारणाची कामे आता प्रशासनाच्या प्राधान्यक्रमावर आली असून, या निर्णयांची गतिमान अंमलबजावणी झाल्यास दुष्काळग्रस्त नागरिकांना आणि शेतकर्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

# SPOT NEWS

## एमआयडीसीच्या रेणुकामाता देवस्थानात २५ फुटी रावणाचे दहन

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

विजयादशमी निमित्त एमआयडीसी नवनागापूर येथील श्री रेणुकामाता देवस्थान ट्रस्टच्या वतीने २५ फुटी रावणाच्या पुतळ्याचे दहन करण्यात आले. रावण दहनाचा थरार अनुभवण्यासाठी पंचक्रोशीतील हजारो भाविकांनी देवस्थानच्या मैदानात मोठी गर्दी केली होती. रावण दहनानंतर करण्यात आलेल्या नेत्रदीपक आतषबाजीने संपूर्ण परिसर उजळून निघाला. 'बोलो सियारामचंद्र की जय'च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला आणि उत्साहपूर्ण वातावरणात विजयादशमीचा सोहळा साजरा करण्यात आला. विजयादशमीनिमित्त देवस्थान परिसरात धार्मिक आणि सांस्कृतिक उत्साहाचे वातावरण होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी मंदिरात श्री रेणुकामातेची विधिवत आरती करण्यात आली. त्यानंतर वाजत-गाजत मिरवणूक काढण्यात आली. हलगी आणि संबळच्या निनादाने परिसरात उत्साह संचारला होता. पारंपरिक वाद्यांच्या तालावर देवस्थान ट्रस्टचे पदाधिकारी आणि भाविकांनी ठेका धरत मिरवणुकीत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या मिरवणुकीतील तालावर नृत्य करणाऱ्या घोड्यांनी उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेतले. तसेच पांडा आणि चिपांझीच्या कार्टून पात्रांनी बालगोपालांचे मनोरंजन केले. लहान मुलांसह नागरिकांनीही या मिरवणुकीचा आनंद घेतला. मंदिर परिसरातून सुरू झालेल्या या मिरवणुकीमुळे विजयादशमीच्या उत्सवाला अधिकच रंगत आली. मिरवणुकीनंतर मंदिरासमोरील मैदानात उभारण्यात आलेल्या २५ फुटी रावणाच्या प्रतिकृतीचे एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत थोरात यांच्या हस्ते दहन करण्यात आले.

# अकोले तालुक्यात अवैध दारूविक्री रोखण्यासाठी संयुक्त कारवाया करा

### बीट अंमलदार व पोलीस पाटलांची जबाबदारी निश्चित करा । प्रांताधिकारी उंडे यांचे निर्देश

**● अकोले । वीरभूमी–**

अकोले तालुक्यात अवैध दारूविक्रीचे प्रमाण कमी होत नसल्याने राज्य उत्पादन शुल्क विभाग आणि पोलिसांनी संयुक्तपणे कारवाया कराव्यात. तसेच संबंधित हद्दीतील अवैध दारूविक्री रोखण्याबाबत बीट अंमलदार आणि पोलीस पाटील यांची जबाबदारी निश्चित करून त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावावी, असे महत्त्वपूर्ण निर्देश प्रांताधिकारी श्री. उंडे यांनी तालुका दारूबंदी समितीच्या बैठकीत दिले.

अकोले तालुका दारूबंदी समितीचे अध्यक्ष प्रांताधिकारी असून, या समितीत तहसीलदार, दोन्ही पोलीस ठाण्यांचे पोलीस निरीक्षक, गटविकास अधिकारी, आरोग्य अधिकारी, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी आणि अशासकीय सदस्य हेरंब कुलकर्णी यांचा समावेश आहे.

बैठकीच्या सुरुवातीला राजूर येथे दारूविक्री करणाऱ्यांची संख्या वाढत असल्याचा मुद्दा हेरंब कुलकर्णी यांनी उपस्थित केला. पोलीस विभागाचे नियंत्रण कमी झाल्याचा आरोप करत संबंधित पोलीस निरीक्षक व कर्मचाऱ्यांवरच कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली.

अकोले येथे पोलीस ठाणे असतानाही जवळच असलेल्या शाहूनगर आणि




साखर कारखाना परिसरात दारूविक्री सुरू असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. तालुक्यात ज्या ठिकाणी दारूविक्री होत असल्याचे निदर्शनास आले आहे, अशा २५ ठिकाणांची यादी त्यांनी प्रांताधिकाऱ्यांना सादर केली.

विरगाव फाटा, देवठाण धरण, समशेरपूर फाटा आणि लहित येथील ज्या हॉटेलमध्ये दारूविक्री होत असल्याचे सांगण्यात आले, त्या हॉटेलची परवानगी रद्द करावी, अशी मागणीही त्यांनी केली. संगमनेर येथून येणाऱ्या दारूच्या मुद्द्यावर डीवायएसपी कुणाल सोनवणे लक्ष देत नसल्याची तक्रारही बैठकीत करण्यात आली.

प्रांताधिकारी उंडे यांनी पोलीस आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून कोणत्या प्रकारच्या कारवाया केल्या जात आहेत, याची माहिती घेतली. बैठकीत सादर करण्यात आलेल्या गावांच्या यादीनुसार कारवाई करून पुढील महिन्यात होणाऱ्या बैठकीत गावनिहाय अहवाल सादर करावा, असे आदेश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी श्री. सावखेडकर यांनी कलम ९३ नुसार बंधपत्र सादर केलेल्या आरोपींची तसेच जप्त केलेल्या दारूची माहिती बैठकीत दिली.

या बैठकीला तहसीलदार सिद्धार्थ मोरे यांच्यासह पोलीस आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

### साखर कारखाना व शाहूनगरमधील दारूविक्रीचा प्रश्न ऐरणीवर

■ अकोले साखर कारखाना परिसरात मोठ्या संख्येने ऊसतोड कामगार आले असून, तेथे उघडपणे अवैध दारूविक्री सुरू असल्याचा मुद्दा अशासकीय सदस्यांनी उपस्थित केला. या परिसरात दारूमुळे अपघात घडल्यास अकोले येथील बीट अंमलदारांना जबाबदार धरावे, अशी मागणी करण्यात आली. शाहूनगर परिसरात दारूमुळे २५ पेक्षा अधिक मृत्यू झाल्याचा दावा करत, या प्रकरणाकडे पोलीस दुर्लक्ष करत असल्याचा आरोपही अशासकीय सदस्यांनी केला. याप्रकरणी अकोले बीट पोलिसांवर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली.

# सुखदेव फुलारी यांना राज्यस्तरीय निर्भीड पत्रकारिता पुरस्कार

### श्री संत किसन महाराज सुडके संस्थानचे साहित्य गौरव व पत्रकारिता पुरस्कार जाहीर

**● नेवासा । वीरभूमी –**

नेवासा तालुक्यातील कांगोणी फाटा येथील श्री संत किसन महाराज सुडके संस्थानच्या वतीने सन २०२६ साठी देण्यात येणारे राज्यस्तरीय साहित्य गौरव व पत्रकारिता पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. भेंडा येथील पत्रकार सुखदेव फुलारी यांना राज्यस्तरीय निर्भीड पत्रकारिता पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. संस्थानचे मठाधिपती गुरुवर्य बाळकृष्ण महाराज सुडके यांनी ही माहिती दिली.

याबाबत अधिक माहिती देताना बाळकृष्ण महाराज सुडके यांनी सांगितले की, आध्यात्मिक कार्यात साहित्याचे असलेले महत्त्व तसेच वारकरी संप्रदायाच्या दृष्टीने नेवासा येथील पैसखांब मंदिरात संत ज्ञानेश्वर महाराज यांनी ज्ञानेश्वरी ग्रंथाची निर्मिती केल्याची ऐतिहासिक परंपरा लक्षात घेऊन संस्थानच्या वतीने साहित्य गौरव पुरस्कारांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेसाठी विविध वाङ्मय प्रकारांतील एकूण १६५ पुस्तके प्राप्त झाली होती. तज्ज्ञ परीक्षकांनी परीक्षण केल्यानंतर विजयादशमीच्या







दिवशी, मंगळवार, दि. २० ऑक्टोबर रोजी साहित्य व पत्रकारिता पुरस्कार २०२६ जाहीर करण्यात आले.

**राज्यस्तरीय साहित्य गौरव पुरस्कार २०२६**

**कथा संग्रह :** सुनील मंगेश जाधव (मर्म), आबासाहेब घावटे (लावण्या), काशिनाथ माटल (सावट).

**आत्मचरित्र व व्यक्तिचरित्र :** डॉ. प्रमोद चौधरी (पैल तिरावरून तर असं झालं), सतीश नाईकवाडे (केकताड), विठ्ठल पांडुरंग पाटील (मायनस शून्य).

**कादंबरी :** शेखर खंडेराव फराटे (मानधुरा मी येतोय), ऋषिकेश रोहिदास गोल्हार (रानोबाचा माळ), राजेश चौरे (जिद्द पेरताना).

**प्रवासवर्णन :** सौ. वासंती प्रकाश घाडगे (देवाचिये द्वारी), प्राचार्य रेखा दीक्षित, कोल्हापूर (अमृत पर्यटनानुभव), विजयालक्ष्मी देवगोजी (मध्यरात्री सूर्य पाहणारा देश).

**ललित लेख :** डॉ. दिनेश वाघुंबरे (मराठी साहित्यातील लोक तत्त्वे), डॉ. योगेश गोतारणे (गाव शहराचा मागोवा), ऊर्मिला चाकुरकर (लेखकाचे घर).

**नाटक :** उदय गणपत जाधव (गार्गी), डॉ. श्रीकांत पाटील (रंजक नाट्यछटा).

**संत साहित्य :** ज्ञानोबा दयारामजी हटवार (ग्रामगीतेतील क्रांती दर्शने).

**काव्यसंग्रह :** इंद्रजित पाटील (लापनिका), एकनाथ देशमुख (गाथा एकनाथा), अरविंदा राजधर भामरे (शापित कोलाहलाच्या नोंदी), आकाश हरिभाऊ भोरडे (झालं बाटुकाचं जिण), चंद्रकांत पोतदार (धुराच्या सैल वेलांट्या).

**बालसाहित्य :** उत्तम सदाकाळ (बोळातलं भूत), मुरहारी कराड (ये रे ये रे ढगोबा), बबन शिंदे (मस्त मजेत राहू).

**राज्यस्तरीय विशेष पुरस्कार – निर्भीड पत्रकारिता पुरस्कार :** सुखदेव फुलारी (भेंडा). **ग्रामीण उद्योग व व्यवसाय पुरस्कार :** सोपानराव शिकारे. **धन्वंतरी पुरस्कार :** डॉ. महेंद्र शिंदे. **शैक्षणिक गुणवत्ता पुरस्कार :** कु. प्राजक्ता कचरे (कुकाणा). **प्रगतशील कृषी पुरस्कार :** श्री. महेश रहाटळ. असे पुरस्कार जाहीर झाले आहेत.

या पुरस्कारांचे वितरण रविवार, दि. २५ ऑक्टोबर रोजी सकाळी ११.३० वाजता कांगोणी फाटा येथील श्री संत किसन महाराज सुडके संस्थान येथे संत-महंत व मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार असल्याचे गुरुवर्य बाळकृष्ण महाराज सुडके यांनी सांगितले.

# जिल्हा बँकेच्या संचालकपदी आ. मोनिका राजळे यांच्या बिनविरोध निवडीचा पाथर्डीत जल्लोष

### नाईक चौकात भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडून फटाके फोडून आनंदोत्सव



**● पाथर्डी । वीरभूमी–**

अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या पाथर्डी तालुका सेवा सहकारी सोसायटी मतदारसंघातून आमदार मोनिका राजळे यांची संचालकपदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल पाथर्डी शहरातील नाईक चौकात भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी फटाके फोडून जल्लोष केला. या निवडीमुळे भाजप कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

गेल्या सुमारे महिनाभरापासून जिल्ह्याच्या राजकारणात केंद्रस्थानी असलेल्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालकपदी आमदार मोनिका राजळे यांची बिनविरोध निवड झाल्याची माहिती मिळताच भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते दुपारी नाईक चौकात एकत्र आले.

यावेळी फटाके फोडून निवडीचे स्वागत करण्यात आले. उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकमेकांचे अभिनंदन करत आनंदोत्सव साजरा केला.

या प्रसंगी पाथर्डीचे नगराध्यक्ष अभय आव्हाड, उपनगराध्यक्ष मंगल कोकाटे, माजी नगराध्यक्ष डॉ. मृत्युंजय गर्जे, नगरसेवक नंदकुमार शेळके, सुभाष बोरुडे, बंडुशेठ बोरुडे, संजय देशमुख, सेवा सोसायटीचे चेअरमन संजय बोरुडे, प्रतीक नांगरे, ॲड. प्रतीक खेडकर, आजिनाथ मोरे, नगरसेविका मनिषा उदमले, ज्योती शर्मा, संदीप पवार, अक्षय काळे, राजेंद्र जायभाये, डॉ. महेश लगड, डॉ. सुहास उरणकर यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# समता इंटरनॅशनल स्कूलमध्ये 'मी अँड मॉम' दांडिया स्पर्धा उत्साहात

### १०० मातृ-पाल्य जोड्यांचा सहभाग । शौर्य शर्मा व मोनिका शर्मा प्रथम क्रमांकाचे मानकरी

**● कोपरगाव । वीरभूमी–**

मातृत्वाचा सन्मान, आई आणि पाल्यांमधील स्नेहबंध अधिक दृढ करणे तसेच भारतीय संस्कृतीचे जतन व संवर्धन करण्याच्या उद्देशाने समता इंटरनॅशनल स्कूलमध्ये आयोजित 'मी अँड मॉम दांडिया स्पर्धा २०२६' उत्साहात पार पडली. या सांस्कृतिक सोहळ्यात तब्बल १०० मातृ-पाल्य जोड्यांनी सहभाग नोंदविला. पारंपरिक वेशभूषा, दांडियाचा ताल आणि नृत्यातून व्यक्त होणाऱ्या मायलेकरांच्या प्रेमबंधांमुळे शालेय परिसरात उत्सवी वातावरण निर्माण झाले.

इयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित या स्पर्धेत आई आणि पाल्यांच्या जोड्यांनी नृत्यकौशल्य, तालबद्धता, कल्पक हालचाली आणि आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणातून उपस्थितांची मने जिंकली. उत्कृष्ट जोडी, नृत्यकौशल्य, पारंपरिक वेशभूषा, कल्पकता आणि सादरीकरणातील वैशिष्ट्यपूर्णता अशा विविध निकषांवर स्पर्धेचे मूल्यमापन करण्यात आले. त्यामुळे प्रत्येक सहभागी जोडीला आपले कलागुण सादर करण्याची आणि वेगळेपण सिद्ध करण्याची संधी मिळाली.

स्पर्धेत शौर्य शर्मा व मोनिका शर्मा यांनी प्रथम, ध्रुव शर्मा व रविना शर्मा यांनी द्वितीय, तर कियांश बागरेचा व रूपाली बागरेचा यांनी तृतीय क्रमांक पटकावला. विजेत्या जोड्यांना ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. याशिवाय विविध निकषांनुसार प्रत्येक गटातून प्रत्येकी १३ विजयी जोड्यांची निवड करून त्यांनाही ट्रॉफी प्रदान करण्यात आली.

कार्यक्रमाला समता इंटरनॅशनल स्कूलच्या कार्यकारी विश्वस्त स्वाती कोयटे यांची प्रमुख उपस्थिती होती. वृंदा पटेल आणि मोनिका पटेल यांनी स्पर्धेचे परीक्षण केले. दांडियाच्या संकल्पनेवर आधारित आकर्षक आणि कलात्मक सजावटीने कार्यक्रमाची शोभा वाढवली. नवरात्रोत्सवाच्या मंगलमय वातावरणाची अनुभूती देणारी सजावट आणि रंगीबेरंगी पारंपरिक वेशभूषेमुळे सोहळ्याला विशेष रंगत आली.

स्वाती कोयटे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या उपक्रमातून शिक्षणासोबत संस्कार, सांस्कृतिक जाणीव आणि कौटुंबिक मूल्यांची जोपासना करण्याचा संदेश देण्यात आला. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कला, संस्कृती आणि पालकांच्या सहभागाला प्रोत्साहन देणारे उपक्रम महत्त्वपूर्ण ठरतात. आईसोबत नृत्य करण्याच्या या संधीमुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळाले, तर मातांनाही आपल्या पाल्यांसोबत आनंदाचे




अविस्मरणीय क्षण अनुभवता आले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी कला शिक्षक विभावरी नगरकर, मंगेश गायकवाड आणि गोरख बोरसे यांच्यासह भक्ती बाभूळके, श्वेताली सदाफळ आणि सायली हराळे यांनी विशेष परिश्रम घेतले. स्मिता गुंजाळ आणि सुनैना शर्मा यांच्यासह विद्यार्थिनी सई भनगे व अलमिरा पठाण यांनी सूत्रसंचालन केले.

मातृत्वाचा सन्मान, भारतीय संस्कृतीचा गौरव आणि आई-पाल्यांमधील नात्यांचा गोडवा जपणारी 'मी अँड मॉम दांडिया स्पर्धा २०२६' समता इंटरनॅशनल स्कूलच्या सांस्कृतिक आणि मूल्याधिष्ठित शिक्षणाच्या परंपरेतील एक संस्मरणीय सोहळा ठरली.

SPOT NEWS

## महावितरणच्या भोंगळ कारभाराविरोधात पीपल्स हेल्पलाईनचे निदर्शने

**अहिल्यानगर । वीरभूमी –**

मंजूर सौर ऊर्जा क्षमता वाढीची नोंद प्रणालीमध्ये अद्ययावत न केल्याने तसेच चुकीच्या नोंदींमुळे अवाजवी वीजबिले आकारली जात असल्याचा आरोप करत महावितरणच्या भोंगळ कारभाराविरोधात पीपल्स हेल्पलाईनच्या वतीने निदर्शने करण्यात आली. या प्रकरणातील तक्रारदार राहुल आढाव यांनी बुधवार, दि. २१ ऑक्टोबर रोजी शहरातील महावितरण विभागीय कार्यालयासमोर उपोषण सुरू केले. मंजूर पाच किलोवॅट सौर क्षमतेची अधिकृत नोंद करून सुधारित वीजबिल द्यावे, मागील दीड ते दोन वर्षांतील सोलर बँक युनिट्सचा हिशोब करावा आणि सुरक्षा ठेवेसंदर्भातील नोंदी दुरुस्त कराव्यात, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत. या आंदोलनात ॲड. कारभारी गवळी, अशोक सब्बन, राहुल आढाव, आनंदा आढाव, वीर बहादूर प्रजापती, शाहीर कान्हू सुंबे, बाळासाहेब पालवे, ऋषिकेश आढाव आदी सहभागी झाले होते. राहुल आढाव यांनी आपल्या घरावरील मूळ तीन किलोवॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा यंत्रणेत अतिरिक्त दोन किलोवॅटची वाढ मंजूर करून घेतली होती. त्यामुळे त्यांच्या सौर यंत्रणेची एकूण मंजूर क्षमता पाच किलोवॅट झाली होती. मात्र, महावितरणचे कर्मचारी, अधिकारी आणि संबंधित व्हेंडर यांच्या निष्काळजीपणामुळे ही वाढ वीज वितरण प्रणालीमध्ये वेळेत अद्ययावत करण्यात आली नाही, असा आरोप करण्यात आला आहे. या चुकीच्या नोंदींमुळे मंजूर पाच किलोवॅट क्षमतेऐवजी दोन किलोवॅट सौर क्षमता नोंदविण्यात आली. परिणामी, मागील दीड ते दोन वर्षांतील सोलर बँक युनिट्सचा अपेक्षित लाभ मिळाला नसल्याचे आढाव यांचे म्हणणे आहे. याशिवाय, ग्राहकाची सुरक्षा ठेवही वीजबिलात समायोजित करण्यात आली असून अवाजवी बिले पाठविण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला आहे. या प्रकरणात आढाव यांनी माहितीच्या अधिकारांतर्गत (आरटीआय) संबंधित माहिती मागविली होती. मात्र, उपविभागीय कार्यालयाकडून अपूर्ण उत्तरे देण्यात आल्याचे त्यांचे म्हणणे आहे.

# बदल स्वीकारा, स्वतःला अद्ययावत ठेवा

### श्री. कृष्णाकुमार नेलनथुला । संजीवनी फार्मसी महाविद्यालयात नवागतांचे स्वागत

**कोपरगाव । वीरभूमी–**

आज शिकलेले ज्ञान उद्या कालबाह्य ठरू शकते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी बदल स्वीकारून स्वतःला सतत अद्ययावत ठेवावे. तंत्रज्ञानाच्या वेगवान युगात तंत्रज्ञानासोबत वाटचाल करताना त्याचा योग्य वापर करावा. कम्फर्ट झोनच्या बाहेर पडून मोठ्या आकांक्षा बाळगाव्यात आणि जागतिक स्पर्धेला सामोरे जाण्यासाठी स्वतःला सक्षम बनवावे, असे आवाहन ॲपोटेक्स इंडिया कंपनीचे डायरेक्टर (एचआर) श्री. कृष्णाकुमार नेलनथुला यांनी केले.

संजीवनी फार्मसी महाविद्यालयात डी. फार्मसी, बी. फार्मसी व एम. फार्मसीच्या प्रथम वर्षातील नवागत विद्यार्थ्यांच्या स्वागत समारंभ व अभिमुखता कार्यक्रमात श्री. नेलनथुला प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. संजीवनी युनिव्हर्सिटीचे प्रेसिडेंट तथा संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे मॅनेजिंग ट्रस्टी श्री. अमित कोल्हे यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले.

यावेळी डायरेक्टर डॉ. विपुल पटेल, कार्पोरेट रिलेशन्स विभागाचे व्हाईस प्रेसिडेंट श्री. इम्राण शेख, डॉ. प्रमोद कडू व डॉ. दीपक मुसमाडे व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाला पालक व विद्यार्थ्यांची उल्लेखनीय उपस्थिती होती.

प्रारंभी डॉ. पटेल यांनी उपस्थितांचे स्वागत करून संजीवनी फार्मसी महाविद्यालयाने प्रस्थापित केलेल्या विविध कीर्तिमानांची माहिती दिली. यावेळी श्री. शेख यांनीही मनोगत व्यक्त केले.

श्री. नेलनथुला म्हणाले की, महाविद्यालयीन जीवन हे केवळ पदवी मिळविण्याचे माध्यम नसून व्यक्तिमत्त्व विकासाची आणि जीवनातील आव्हानांसाठी स्वतःला घडविण्याची महत्त्वपूर्ण संधी आहे. या काळात ज्ञान, कौशल्ये आणि जीवनमूल्ये आत्मसात करा. शिस्त पाळा, नैतिक मूल्ये जपा आणि चुकीच्या गोष्टींबाबत कोणतीही तडजोड करू नका.

बदल स्वीकारा, सकारात्मक दृष्टिकोन ठेवा आणि प्रत्येक आव्हानाकडे शिकण्याची संधी म्हणून पाहा. सातत्यपूर्ण प्रयत्न, संयम आणि चारित्र्य ही यशाची गुरुकिल्ली आहे. यश मिळाल्यानंतर नम्रता जपा आणि अपयशातून शिकत पुढे जा. जागतिक घडामोडी व नवतंत्रज्ञानाचे ज्ञान घेताना भावनिक बुद्धिमत्ता आणि बौद्धिक क्षमतांचा समतोल राखा. विचार जागतिक स्तरावर करा; मात्र कृती करताना स्थानिक गरजा आणि परिस्थितीचे भान ठेवा. या गुणांच्या बळावर सक्षम व्यक्तिमत्त्व घडवून व्यावसायिक आणि वैयक्तिक जीवनात यशस्वी व्हा, असेही त्यांनी सांगितले.




### ग्रामीण विद्यार्थ्यांना जागतिक संधींची जोड

संजीवनी संस्थेचे संस्थापक स्व. शंकरराव कोल्हे यांची ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्वावलंबी बनविण्याची दूरदृष्टी होती. त्याच विचारांचा वारसा संजीवनीचे अध्यक्ष श्री. नितीनदादा कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली समर्थपणे पुढे सुरू आहे. ग्रामीण भागात कार्यरत असूनही संजीवनी फार्मसी संस्था विनाअनुदानित वर्गवारीत महाराष्ट्रातील पहिली आणि देशातील नववी स्वायत्त दर्जा प्राप्त संस्था आहे. विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे शिक्षण मिळावे, यासाठी जागतिक स्तरावरील अभ्यासक्रमांचा समावेश करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांनी जागतिक स्तरावर स्पर्धा करण्यासाठी जपानी, स्पॅनिश, जर्मन आणि चिनी या परदेशी भाषांचे ज्ञान मिळवावे. तसेच आंतरराष्ट्रीय इंटर्नशिपच्या संधींचा लाभ घेऊन जागतिक स्पर्धेला सामोरे जाण्यासाठी स्वतःला सक्षम बनवावे. यासोबतच लिंक्डइनसारख्या समाजमाध्यमांचा प्रभावी वापर करून व्यावसायिक नेटवर्क वाढवावे. यामुळे कर्तृत्ववान व्यक्तींशी संपर्क प्रस्थापित करण्यास तसेच जागतिक स्तरावरील संधी प्राप्त करण्यास निश्चितच मदत होईल, असे श्री. अमित कोल्हे, प्रेसिडेंट, संजीवनी युनिव्हर्सिटी यांनी सांगितले.

## पारनेरमधील ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयात विजयादशमीला कुमारिका पूजन

### उपक्रमातून नारीशक्तीचा सन्मान; संस्कार, पवित्रता आणि आध्यात्मिक मूल्यांचा संदेश

**पारनेर । वीरभूमी –**

साडेतीन मुहूर्तांपैकी एक मानल्या जाणाऱ्या विजयादशमी अर्थात दसरा सणाचे औचित्य साधून पारनेर शहरातील ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या पारनेर सेंटरच्या वतीने कुमारिका पूजनाचा कार्यक्रम भक्तिमय आणि आध्यात्मिक वातावरणात उत्साहात पार पडला. या उपक्रमातून कन्येतील दैवी गुणांचा गौरव, नारीशक्तीचा सन्मान आणि भारतीय संस्कृतीतील पवित्र परंपरांचे जतन करण्याचा संदेश देण्यात आला.

विजयादशमी हा सण सत्याचा असत्यावर, सद्गुणांचा दुर्गुणांवर आणि प्रकाशाचा अंधारावर विजय मिळविण्याचे प्रतीक मानला जातो. या मंगलदिनी कुमारिका पूजनाच्या माध्यमातून बालिकांमधील निरागसता, प्रेम, करुणा, पवित्रता आणि संस्कारांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमात पालकांनी आपल्या कन्यांचे विधिपूर्वक पूजन केले. कन्यांना औक्षण करून त्यांच्याप्रती आदरभाव व्यक्त करण्यात आला. तसेच त्यांना मिठाई देऊन आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

भारतीय संस्कृतीमध्ये कन्येला देवीस्वरूप मानून तिचा सन्मान करण्याची परंपरा आहे. कुमारिका पूजन हा केवळ धार्मिक विधी नसून प्रत्येक मुलीकडे सन्मानाने पाहण्याची, तिच्या अस्तित्वाचा स्वीकार करण्याची आणि तिच्यातील सुप्त गुणांना प्रोत्साहन देण्याची प्रेरणा देणारा उपक्रम आहे. मुलींना प्रेम, सुरक्षितता, समान संधी आणि चांगले



संस्कार मिळाल्यास त्या समाजाच्या सर्वांगीण विकासात महत्त्वपूर्ण योगदान देऊ शकतात, हा विचार या कार्यक्रमातून अधोरेखित करण्यात आला.

यावेळी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या पारनेर सेंटरच्या संचालिका ब्रह्माकुमारी साधना दीदी यांचेही विधिपूर्वक पूजन करून त्यांना भेटवस्तू प्रदान करण्यात आली. त्यांच्या मार्गदर्शनातून उपस्थितांना आध्यात्मिक विचारांची प्रेरणा मिळाली. मनाची शुद्धता, सकारात्मक विचार, आत्मिक शांती, संयम आणि प्रेमभाव यांचे दैनंदिन जीवनातील महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

आध्यात्मिक जीवन म्हणजे केवळ पूजा-अर्चा नव्हे, तर विचार, वाणी आणि कृतीमध्ये पवित्रता आणणे होय. प्रत्येक व्यक्तीने आत्मचिंतन करून राग, द्वेष, मत्सर आणि नकारात्मक विचारांपासून दूर राहण्याचा प्रयत्न करावा. घरात प्रेमळ वातावरण निर्माण करणे, परस्परांचा आदर राखणे आणि मुलांमध्ये चांगले संस्कार रुजविणे यासाठी पालकांची भूमिका महत्त्वाची असल्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

कुमारिका पूजनाच्या निमित्ताने धार्मिक श्रद्धेसोबतच नैतिक मूल्ये, संस्कार आणि स्त्रीसन्मानाचे महत्त्व अधोरेखित झाले. भक्तिभाव, आनंद आणि आध्यात्मिक प्रेरणेने परिपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमातून विजयादशमीचे सांस्कृतिक व आध्यात्मिक महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित करण्यात आले.

## कोपरगाव रेल्वे स्थानकावर स्वतंत्र आरपीएफ ठाणे द्या

### आ. आशुतोष काळेंची मध्य रेल्वे महाव्यवस्थापकांकडे मागणी

**कोपरगाव । वीरभूमी–**

नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर शिर्डीत येणाऱ्या लाखो साईभक्तांचा प्रवास सुरक्षित व सुखकर व्हावा, यासाठी कोपरगाव रेल्वे स्थानकावर पूर्णवेळ स्वतंत्र रेल्वे सुरक्षा बलाचे (आरपीएफ) ठाणे मंजूर करून तेथे रेल्वे पोलीस निरीक्षकांची तातडीने नियुक्ती करावी, अशी मागणी आमदार आशुतोष काळे यांनी मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक राजीव श्रीवास्तव यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात आ. आशुतोष काळे यांनी म्हटले आहे की, कोपरगावला ऐतिहासिक व पौराणिक वारसा लाभला असून सिंहस्थ कुंभमेळ्याच्या काळात देशभरातून साधू-संत तसेच लाखो भाविक कोपरगावमार्गे शिर्डीकडे ये-जा करणार आहेत. साईनगर शिर्डी टर्मिनस स्थानकावर इंजिन बदलण्याच्या तांत्रिक मर्यादा असल्याने मुख्य रेल्वे मार्गावरील अमृत भारत दर्जा प्राप्त कोपरगाव रेल्वे स्थानक या काळात महत्त्वाचे केंद्र ठरणार आहे.

कुंभमेळ्यादरम्यान नाशिकमध्ये येणाऱ्या लाखो भाविकांपैकी सुमारे २५ टक्के भाविक शिर्डी व कोपरगाव



परिसरातील देवस्थानांना भेट देतात. कुंभमेळ्याच्या काळात शिर्डीत दररोज सुमारे १.५ लाख भाविक, तर कोपरगाव रेल्वे स्थानकावर दररोज १० ते १५ हजार प्रवासी येण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. त्यामुळे प्रवाशांची वाढणारी गर्दी तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न लक्षात घेता कोपरगाव रेल्वे स्थानकावर स्वतंत्र आरपीएफ ठाणे उभारणे गरजेचे असल्याचे आ. काळे यांनी निवेदनात नमूद केले आहे.

आ. आशुतोष काळे यांनी मार्च २०२७ पूर्वी कोपरगाव येथे स्वतंत्र आरपीएफ ठाणे उभारण्याची मागणी केली आहे. या ठाण्यासाठी १ पोलीस निरीक्षक, १ उपनिरीक्षक, १ सहाय्यक उपनिरीक्षक, १० हेड कॉन्स्टेबल आणि ११ कॉन्स्टेबल, असे एकूण २४ जवान नियुक्त करावेत. याशिवाय कॉन्स्टेबल संवर्गातील १५ कायमस्वरूपी पदे मंजूर करावीत, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

आरपीएफ जवानांच्या निवासासाठी स्थानक परिसरात २० खाटांचे सर्व सुविधायुक्त स्वतंत्र निवासस्थान उभारण्याचा प्रस्तावही मध्य रेल्वेच्या प्रधान मुख्य अभियंत्यांकडे सादर करण्यात आला असून त्यासाठी २.४ कोटी रुपयांची तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

सिंहस्थ कुंभमेळा सुरू होण्यापूर्वीच नवनियुक्त आरपीएफ अधिकारी व जवानांना स्थानिक भौगोलिक परिस्थिती आणि कार्यपद्धतीची माहिती होण्यासाठी कोपरगाव येथे तातडीने आरपीएफ ठाणे सुरू करावे, अशी मागणी आ. आशुतोष काळे यांनी मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक राजीव श्रीवास्तव यांच्याकडे केली आहे.

या उपाययोजनांमुळे कोपरगाव रेल्वे स्थानकावरील सुरक्षाव्यवस्था अधिक सक्षम होऊन भाविक व प्रवाशांचा प्रवास सुरक्षित आणि सुखकर होण्यास मदत होईल, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

# मध्यस्थीतून प्रकरणे मिटवा; वेळ आणि पैशांची बचत करा!

### न्यायाधीश एस. एस. पाखले । श्रीगोंदा न्यायालयात 'एडीआर पद्धती व त्याचे फायदे' विषयावर व्याख्यान

**श्रीगोंदा । वीरभूमी–**

मध्यस्थी आणि लोकन्यायालयाच्या माध्यमातून अधिकाधिक प्रकरणे सामोपचाराने निकाली काढावीत. यामुळे पक्षकारांचा वेळ आणि पैसा वाचण्यास मदत होईल, असे आवाहन दिवाणी न्यायाधीश एस. एस. पाखले यांनी केले. श्रीगोंदा जिल्हा न्यायालयात तालुका विधी सेवा समिती आणि श्रीगोंदा वकील संघाच्या संयुक्त विद्यमाने 'एडीआर पद्धती व त्याचे फायदे' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा न्यायाधीश डी. पी. शिंगाडे होते.

न्यायाधीश पाखले म्हणाल्या की, पर्यायी वाद निवारण पद्धतीमध्ये मध्यस्थी ही महत्त्वाची प्रक्रिया आहे. सर्वोच्च न्यायालय आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाच्या निर्देशानुसार मध्यस्थी उपक्रम राबविण्यात येत आहे. दि. २१ नोव्हेंबर २०२६ रोजी परक्राम्य संलेख अधिनियमाच्या कलम १३८ अंतर्गत विशेष लोकअदालत, तर १२ डिसेंबर २०२६ रोजी लोकअदालत आयोजित करण्यात आली आहे. पक्षकारांनी या संधीचा लाभ घेऊन आपली प्रकरणे सामोपचाराने मिटवावीत, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमात ऊसतोड मजुराच्या कुटुंबातील सुरेखा मातने हिचा विशेष गौरव करण्यात आला. जिद्द, कठोर परिश्रम आणि चिकाटीच्या जोरावर तिने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आंतरविभागीय क्रॉसकंट्री स्पर्धेत नाशिक येथे उत्कृष्ट कामगिरी केली. तिची अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रॉसकंट्री स्पर्धेसाठी मंगळूर (कर्नाटक) येथे निवड झाल्याबद्दल सुरेखा आणि तिच्या वडिलांचा न्यायाधीशांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

चांडगाव येथील श्रद्धा रमेश लोंढे हिने अंध विद्यार्थ्यांसाठी विकसित केलेल्या कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित शिक्षक सहाय्यक उपकरणाला भारत सरकारच्या इन्स्पायर अवॉर्ड स्पर्धेत राष्ट्रीय स्तरावर प्रथम क्रमांक मिळविला. तिची जपान येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय इन्स्पायर अवॉर्ड स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल श्रद्धा, तिचे वडील आणि मार्गदर्शक शिक्षक सुभाष गायकवाड यांचा न्यायाधीशांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.



या कार्यक्रमाला जिल्हा न्यायाधीश एस. एच. साळुंखे, सहदिवाणी न्यायाधीश एस. पी. केकान, यू. वाय. बोराडे-कपूर, ए. एम. मुजावर, पी. व्ही. पाटील, आर. बी. खवले, श्रीगोंदा वकील संघाचे अध्यक्ष ॲड. जयंत शिंदे यांच्यासह ॲड. व्ही. एन. घोडके, ॲड. एस. बी. सातपुते, ॲड. राजन नहार, ॲड. अशोक भोयटे, ॲड. योगिता कांडेकर, ॲड. चैत्राली साळुंके, ॲड. अश्विन फडणीस, ॲड. अमोल मांडे, ॲड. विशाल झराड, ॲड. तुषार कोथिंबीरे, ॲड. शिरीष ओहोळ आदी वकील, पक्षकार व न्यायालयीन कर्मचारी उपस्थित होते.

सूत्रसंचालन ॲड. कावेरी डहाळे व ॲड. कोमल कोथिंबीरे यांनी केले. श्रीगोंदा वकील संघाचे अध्यक्ष ॲड. जयंत शिंदे यांनी आभार मानले.

# वन्यजीवांसाठी घोटभर पाणी उपलब्ध करून देणे ही काळाची गरज

## पारनेर तालुक्यात पाणवठे भरण्याची गरज | नागरिक, शेतकरी आणि वनविभागाने पुढाकार घेण्याचे आवाहन

**● पारनेर | वीरभूमी –**

पावसाने दीर्घकाळ दडी मारल्याने वाढता उन्हाचा तडाखा, घटते जलस्रोत आणि जंगल परिसरातील पाण्याची कमतरता यामुळे वन्यजीवांची पाण्यासाठी भटकंती सुरू झाली आहे. तहान भागविण्यासाठी वन्यप्राणी मानवी वस्त्यांकडे धाव घेत असल्याने त्यांच्या जीविताला धोका निर्माण होण्याबरोबरच मानव-वन्यजीव संघर्ष वाढण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर वन्यजीवांसाठी घोटभर पाणी उपलब्ध करून देणे ही काळाची गरज बनली असून, परिसरातील पाणवठे भरून काढण्यासाठी नागरिकांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन निसर्गप्रेमींकडून करण्यात येत आहे.

पारनेर तालुक्यातील वनक्षेत्रासह ग्रामीण भागात पाण्याची टंचाई तीव्र होऊ लागली आहे. पावसाअभावी नैसर्गिक ओढे, नाले, तलाव आणि लहान जलस्रोत कोरडे पडत असल्याने पक्षी, ससे, कोल्हे, मोर तसेच इतर वन्यप्राण्यांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. पाण्याच्या शोधात हे प्राणी शेतशिवारात, रस्त्यांवर आणि गावांच्या आसपास येत आहेत. त्यामुळे वाहनांच्या धडकेत अपघात होण्याची तसेच मानव आणि वन्यजीव यांच्यात संघर्ष निर्माण होण्याची भीती व्यक्त होत आहे.



### पाणवठे भरण्यासाठी वनविभागाने पुढाकार घ्यावा

■ सामाजिक संघटना आणि निसर्गप्रेमींनी पुढाकार घेऊन परिसरातील पाणवठे भरून काढण्याची आवश्यकता आहे. त्याचबरोबर वनविभागाने प्रशासकीय यंत्रणेच्या माध्यमातून वन्यजीवांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात.

**– विनोद गोळे,** निसर्गप्रेमी

वन्यजीवांना पिण्यासाठी पाणी उपलब्ध व्हावे, यासाठी शेतशिवारात, जंगलालगतच्या सुरक्षित ठिकाणी आणि पक्ष्यांची वर्दळ असलेल्या परिसरात पाण्याची व्यवस्था करणे आवश्यक आहे. नागरिकांनी मातीची किंवा सिमेंटची भांडी ठेवून त्यामध्ये स्वच्छ पाणी भरावे. ही भांडी रस्त्याच्या कडेला किंवा वाहनांची वर्दळ असलेल्या ठिकाणी न ठेवता सावलीच्या आणि सुरक्षित जागी ठेवावीत.

पाण्याची भांडी नियमितपणे स्वच्छ करून त्यातील पाणी बदलणे गरजेचे आहे. पाणवठ्यांमध्ये प्लास्टिक किंवा अन्य कचरा टाकू नये. पाण्याची व्यवस्था करताना वन्यप्राण्यांना त्रास होणार नाही, तसेच त्यांच्या नैसर्गिक अधिवासाला बाधा पोहोचणार नाही, याचीही काळजी घ्यावी.

वन्यजीव हे निसर्गसाखळीचा महत्त्वाचा भाग आहेत. त्यांचे संरक्षण करणे ही केवळ वनविभागाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. उन्हाळ्यात तहानलेल्या पक्ष्यांना आणि वन्यप्राण्यांना पिण्यासाठी पाणी उपलब्ध करून देण्याचा छोटासा प्रयत्नही त्यांच्यासाठी मोलाचा ठरू शकतो.

त्यामुळे पारनेर तालुक्यातील नागरिक, शेतकरी, युवक मंडळे आणि सामाजिक संस्थांनी एकत्र येऊन वन्यजीवांसाठी पाण्याची व्यवस्था करावी. तसेच वनविभागाने प्रशासकीय यंत्रणेच्या माध्यमातून वनक्षेत्रातील पाणवठे नियमित भरून वन्यजीवांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा निसर्गप्रेमींकडून व्यक्त होत आहे.

# आढळगावच्या नवरात्रोत्सवातून सामाजिक ऐक्याचा जागर!

## साई स्पंदन व जनानंद फाउंडेशनचा पुढाकार | धार्मिक परंपरेसोबत सर्वधर्मसमभावाचा संदेश

**● श्रीगोंदा | वीरभूमी–**

धार्मिक श्रद्धा, सांस्कृतिक परंपरा आणि सामाजिक सलोखा यांचा सुंदर संगम साधत आढळगाव येथे साई स्पंदन फाउंडेशन व जनानंद फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने 'नवरात्र फेस्टिव्हल आढळगाव २०२६' उत्साहात साजरा करण्यात येत आहे. नऊ दिवस चालणाऱ्या या उत्सवातून देवीच्या आराधनेसोबतच सामाजिक एकोपा, बंधुभाव आणि सर्वधर्मसमभावाचा संदेश दिला जात आहे.



उत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे नऊ दिवस विविध क्षेत्रांतील मान्यवरांना देवीच्या मानाच्या आरतीचा सन्मान देण्यात येतो. या मानकऱ्यांना महेंद्र शिंदे यांच्या वतीने ज्ञानेश्वरी ग्रंथ भेट देऊन गौरविण्यात येते. या उपक्रमातून आध्यात्मिक विचारांचा प्रसार आणि भारतीय संस्कृती व परंपरांचे जतन करण्याचा प्रयत्न केला जात आहे. जिल्ह्यातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांनीही या उत्सवाला उपस्थिती लावली.

नवरात्रोत्सवानिमित्त नऊ दिवस विविध धार्मिक, सांस्कृतिक आणि मनोरंजनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. भाविकांसाठी फराळाचे वाटप, लहान मुलांसाठी मनोरंजनात्मक खेळ, तसेच महिलांसाठी गरबा आणि दांडिया कार्यक्रमांची मेजवानी आहे. त्यामुळे महिला, युवक, बालकांसह ग्रामस्थांचा उत्सवातील सहभाग वाढत असून गावातील सांस्कृतिक वातावरण अधिक उत्साही झाले आहे.

विशेष म्हणजे, उत्सवाच्या माध्यमातून धार्मिक परंपरांचे जतन करतानाच सामाजिक सलोखा जपण्यावर आयोजकांनी भर दिला आहे. धर्म, जात आणि पंथ यांपलीकडे जाऊन माणुसकीचे नाते जपण्याचा संदेश या उपक्रमातून दिला जात आहे. ग्रामस्थांच्या सहकार्याने उत्सव आनंदात पार पडत असून, साई स्पंदन फाउंडेशन व जनानंद फाउंडेशनच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

याबाबत अधिक माहिती देतांना साई स्पंदन सोशल फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष पै. सुभान तांबोळी म्हणाले की, मी मुस्लिम समाजातील युवक असून, भारताच्या 'विविधतेत एकता' या विचारावर माझा दृढ विश्वास आहे. धर्म वेगवेगळे असले, तरी आपली माती, संस्कृती आणि माणुसकी एकच आहे. याच भावनेतून आम्ही गेल्या अनेक वर्षांपासून गणेशोत्सव, नवरात्रोत्सव आणि विविध सामाजिक उपक्रमांत उत्स्फूर्तपणे सहभागी होत आहोत.

आमचा उद्देश केवळ उत्सव साजरा करणे नसून, समाजात सर्वधर्मसमभाव, जातीय सलोखा, राष्ट्रीय एकात्मता आणि सामाजिक बांधिलकी अधिक दृढ करणे हा आहे. आज समाजाला मतभेदांपेक्षा संवादाची, द्वेषापेक्षा प्रेमाची आणि विभाजनापेक्षा एकतेची गरज आहे. उत्सव हे मने जोडण्याचे प्रभावी माध्यम आहे.

धर्म, जात, भाषा आणि पंथ यांच्या पलीकडे जाऊन आपण सर्वप्रथम भारतीय आहोत, ही भावना प्रत्येकाने जपली पाहिजे. त्यातूनच समाज अधिक सक्षम, एकसंध आणि समृद्ध होईल.

# श्रीक्षेत्र मोहटादेवी गडावर शस्त्रपूजन

## विजयादशमीच्या मुहूर्तावर देवीसमोर परंपरेनुसार पूजन

**● पाथर्डी | वीरभूमी–**

विजयादशमीनिमित्त श्रीक्षेत्र मोहटादेवी गडावर देवस्थानच्या विविध शस्त्रांचे पारंपरिक पद्धतीने शस्त्रपूजन करण्यात आले. देवस्थान समितीचे विश्वस्त बाबासाहेब दहिफळे, शशिकांत दहिफळे, शुभम दहिफळे, अशोक दहिफळे, राजेंद्र शिंदे, बाळूशेट लाहोटी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे यांच्या हस्ते हे पूजन करण्यात आले.



श्री मोहटादेवीच्या मूर्तीसमोर देवस्थानची सर्व शस्त्रे ठेवून विधिवत पूजन करण्यात आले. यावेळी देवस्थानचे जनसंपर्क अधिकारी भीमराव खाडे, मोहटा ग्रामस्थ, भाविक-भक्त आणि कर्मचारी उपस्थित होते.

विजया दशमीच्या शुभमुहूर्तावर सायंकाळी देवस्थानचे मुख्य पुजारी भूषण साकरे तसेच पुरोहित भास्कर देशपांडे आणि विकास क्षीरसागर यांच्या मंत्रोच्चारात शस्त्रपूजनाचा धार्मिक सोहळा पार पडला. पूजनानंतर सायंकाळी देवीची आरती करण्यात आली.

दसऱ्याच्या दिवशी देवस्थानची विविध शस्त्रे, वाहने तसेच हिशोब व लिखाणासाठी वापरण्यात येणाऱ्या वह्या आदींचे देवीसमोर परंपरेनुसार पूजन करण्याची प्रथा आहे. यंदाही अत्यंत धार्मिक वातावरणात हा सोहळा पार पडला.

शारदीय नवरात्रोत्सवादरम्यान श्रीक्षेत्र मोहटादेवी गडावर देवीच्या दर्शनासाठी लाखो भाविकांची गर्दी झाली. होमहवनाच्या कार्यक्रमाने नवरात्रोत्सवाची सांगता झाली.

दरम्यान, यात्रेनिमित्त देवीची पालखी सवाद्य मिरवणुकीने गावातून काढण्यात येणार आहे. गुरुवारी सकाळी कलावंतांच्या हजेऱ्यांचा कार्यक्रम होणार असून, त्यानंतर जंगी कुस्त्यांच्या आयोजनाने यात्रेची सांगता होणार आहे. कोजागरी पौर्णिमेला शारदीय नवरात्रोत्सवाची अंतिम सांगता होणार आहे.

# पुस्तकांच्या पानोपानी दरवळला हळदी-कुंकवाचा सुगंध!

## पिंटो ग्रंथालयाचा स्तुत्य उपक्रम | नारीशक्तीचा दुष्काळाशी लढण्याचा संकल्प, नवरात्रीत १४० महिला बनल्या वाचन चळवळीच्या भागीदार

**● निघोज | वीरभूमी–**

नवरात्रोत्सवाच्या पावन पर्वावर पाडळी आळे (ता. पारनेर) येथील 'पिंटो ग्रंथालया'च्या वतीने आयोजित 'वाचन संस्कृतीचा जागर' या उपक्रमाची सांगता हळदी-कुंकू समारंभाने उत्साहात झाली. पुस्तकांच्या पानोपानी हळदी-कुंकवाचा सुगंध दरवळवणाऱ्या या अभिनव उपक्रमातून महिलांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासोबतच पाणीबचत आणि दुष्काळाशी लढण्याचा संकल्प करण्यात आला. या उपक्रमाचे संपूर्ण परिसरातून कौतुक होत आहे.

या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे, सरपंच कविता डेरे यांनी वाचन चळवळ घराघरांत पोहोचवण्यासाठी महिलांना वाचनाचे महत्त्व समजावून सांगितले. महिलांच्या आवडत्या पुस्तकांवरील उत्कृष्ट अभिप्राय स्पर्धेत सौ. अपर्णा जगताप, पूजा शिंदे, सुरेखा आवारी, ज्योती लायगुडे, पूजा गावडे, तसेच वैशाली डोकडे व अंजना डोकडे यांना उत्तेजनार्थ पारितोषिके व सन्मानचिन्हे प्रदान करण्यात आली. ही पारितोषिके कै. दत्तात्रेय गावडे यांच्या स्मरणार्थ देण्यात आली.

साधना डेरे व उज्ज्वला डेरे यांच्यातर्फे देण्यात आलेली क्रांतीज्योती सावित्रीबाई मानाची पैठणी ज्योती लायगुडे यांना मिळाली. तसेच नवरात्रीची मानाची पैठणी व सन्मान अर्चना थोरात आणि काजल येवले यांना प्रदान करण्यात आला.

गेल्या आठ दिवसांपासून सुरू असलेल्या या स्पर्धेला महिलांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या उपक्रमामुळे गावात ज्ञानाचा नवा जागर पाहायला मिळाला. एरवी शेतात आणि घरकामात व्यस्त असणाऱ्या महिलांची पावले आता ग्रंथालयाकडे वळू लागली आहेत. शेतात राबणारे हात ग्रंथांच्या पानांवर फिरू लागले असून, नवरात्रीच्या काळात तब्बल १४० महिला वाचन चळवळीच्या सभासद झाल्या आहेत. आदिशक्तीच्या पूजेसोबतच ज्ञानशक्तीचा जागर घडवून आणणारा हा उपक्रम प्रेरणादायी ठरला आहे.

महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पाण्याचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. दुष्काळाचे सावट शेताच्या बांधावर दिसत असले, तरी त्याची झळ घरातील चुलीपर्यंत पोहोचते. त्यामुळे पाणीबचत करणे आणि शेतीसाठी पाण्याचा वापर काटकसरीने करणे आवश्यक असल्याचे आवाहन योगशिक्षिका सुरेखाताई आवारी यांनी केले. उपस्थित महिलांनीही पाणी जपून वापरण्याचा आणि दुष्काळाशी एकजुटीने लढण्याचा संकल्प केला.



या कार्यक्रमात कृतज्ञता आणि सामाजिक बांधिलकीचा प्रत्ययही आला. पिंटो ग्रंथालयाच्या कर्तव्यदक्ष सेविका काजल येवले यांच्या कन्येच्या भविष्यातील शिक्षणासाठी ख्यातनाम लेखक जेरी पिंटो यांनी 'इएमजी' माध्यमातून एक लाख रुपयांची आर्थिक मदत दिली. मदतीचा धनादेश सौ. रजनीताई थोरात आणि सरपंच सौ. कविताताई डेरे यांच्या हस्ते काजल येवले यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला.

या उपक्रमातून महिलांच्या वाचनाला प्रोत्साहन देतानाच त्यांच्या सामाजिक आणि आर्थिक सक्षमीकरणालाही हातभार लावण्यात आला. वाचन, जलसंवर्धन आणि सामाजिक बांधिलकी यांचा सुंदर संगम घडवणारा पिंटो ग्रंथालयाचा हा उपक्रम परिसरात कौतुकाचा विषय ठरला आहे.

हळदी-कुंकू कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रजनीताई थोरात होत्या. प्रमुख पाहुण्या म्हणून मोनिका थोरात, विमल थोरात, संगीता शिर्के मॅडम, ज्योती डेरे, अलका परंडवाल, सोसायटीच्या व्हाइस चेअरमन मनीषा डेरे, माजी सरपंच अरुणा डेरे, सामाजिक कार्यकर्त्या पुष्पाताई डेरे, ग्रामसदस्या अश्विनी डेरे तसेच संगमेश्वर महिला ग्राम संघाच्या प्रतिनिधींसह शेकडो महिला उपस्थित होत्या.

वीरभूमी
हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर–४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com